**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. कृष्णाजी शिवराम बनसोडे
मु.पो.वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस
तहसील कार्यालय माळशिरस, जि. सोलापूर .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
माळशिरस, तहसील कार्यालय माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३३ /सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. कृष्णाजी शिवराम बनसोडे<br>मु.पो.वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस<br>तहसील कार्यालय माळशिरस, जि. सोलापूर श्री.वैभव वि. नावडकर | |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीची छायांकित प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्रीमती धोंडूबाई शंकर सरतापे यांचा निर्वाह भत्याबाबतचा अर्ज योग्य असूनही मंजूर करण्यात आला नाही. त्याबद्दलची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर यांनी १३९ दिवस विलंबाने दिली. त्यांना शास्ती करावी व

श्रीमती सरतापे यांना निर्वाह भत्ता मंजूर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री. कृष्णाजी शिवराम बनसोडे यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस.एम. पोरे हे सेवानिवृत्त झाले आहेत. संबंधित माहिती आपल्या कार्यालयाच्या अभिलेखातील नव्हती व सन २००२ ते २००८ पर्यंतची माहिती संजय गांधी लिपिक यांच्याकडून वारंवार मागणी करुनही पूर्ण स्वरुपात प्राप्त झाली नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी नमूद केले होते. माहिती प्राप्त करुन घेऊन सात दिवसांत देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस यांनी दिले. दि. १८.९.२००८ रोजी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, यांनी दि.२४.९.२००८ च्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास दि. ४.१०.२००८ रोजी मिळाली, असे प्रतिपादन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर श्री. वैभव वि. नावडकर यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर यांनी माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस श्री. श्रीकांत पोरे यांनी दि.२९.५.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. संबंधित कालावधीत आपल्या मूळ पदाव्यतिरिक्त तीन पदांचे अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे होते. काही माहिती अभिलेखात नसलेली व काही माहिती संकलित करुन देणे आवश्यक अशी होती. विलंब झाल्यामुळे ती नि:शुल्क दिली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी, माळशिरस श्री. श्रीकांत पोरे यांनी खुलाशात विस्ताराने नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. तसेच त्या अनुषंगाने त्या आधीही त्यांनी माहितीच्या अधिकारात व अन्य स्वरुपाचे अर्ज केले असल्याचे व त्यांना त्या त्या वेळी उत्तर /माहिती देण्यात आली असल्याचे दिसून

येते. मात्र अधिक काटेकोरपणे कार्यवाही करणे / उत्तर देणे आवश्यक होते, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी, माळशिरस श्री. श्रीकांत पोरे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. 31 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अरविंद भमराव गवळी
रा.ए वॉर्ड, नेवरेकर कॉलनी, ता.आजरा, जि.कोल्हापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, करवीर
ता.करवीर, जि.कोल्हापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५/ २०१० /कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १९.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. शरद वसंतराव पाटील | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अप्पर तहसीलदार, बिनशेती कार्यालय, कोल्हापूर यांनी कोणतीही चौकशी अथवा छाननी न करता दि.५.५.२००० रोजी दिलेल्या बिनशेती आदेशाच्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती व माहिती आपण मागितली होती. परंतु आठ महिने पाठपुरावा करुनही ती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अरविंद भीमराव गवळी यांनी लेखी निवेदनाद्वारे केली.

अप्पर तहसीलदार (बिनशेती), कोल्हापूर हे कार्यालय सन २००५ मध्ये बंद झाले. तेथील कागदपत्रांचे हस्तांतर झाले नाही. संबंधित प्रकरण आजरा तालुक्यातील असून त्यातील कागदपत्रे आपल्या कार्यालयाकडे नाहीत. पूर्वी सदर पद जिल्हाधिकारी कार्यालयात होते व तेथून जिल्हयाचे त्याबाबतचे कामकाज चालत होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर श्री. शरद वसंतराव पाटील यांनी केले.

संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन अपीलकर्त्यास दहा दिवसांत पुरविण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर यांनी व चिटणीस, जिल्हाधिकारी, कार्यालय कोल्हापूर यांनी आयोगास दि. २५.८.२०१० पर्यंत सादर करावा.

पुणे.
दि. 30 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण सुखदेव ताड
मु.एकलासपूर, पो.अनवली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि. सोलापूर विद्यमान श्री.शैलेश सूर्यवंशी, तत्कालीन-बाबूराव पवार

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर श्री.सचिन महादेव डोंगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

ग्रामीण रोजगार योजनेतील आठ वर्षांची अत्यंत विस्तृत माहिती अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती. आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे अपीलकर्त्यांनी नमूद केले असून त्यांना शुल्क आकारणे शक्य नव्हते. सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यासाठी सुमारे २०००००/- रूपये शुल्क झाले असते. कार्यालयाकडे अनुदानाची उपलब्धता नसल्यामुळे अभिलेख अवलोकन करावे,असे त्यांना कळविले होते. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर यांनीही अपिलाच्या निकालात तसे स्पष्ट केले होते. तरीही अपीलकर्ता अभिलेख अवलोकनासाठी आले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि. सोलापूर श्री.सचिन महादेव डोंगरे यांनी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जस्मीतसिंग बग्गा
१३६३ / ५, कृष्णा अपार्टमेंट, टायटन शोरूममागे, शिवाजीनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण,
उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जस्मीतसिंग बग्गा
१३६३ / ५, कृष्णा अपार्टमेंट, टायटन शोरूममागे, शिवाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण,
उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती मीरा श्रीनिवास सबनीस

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

बांधकामाला सुरुवात करताना व पूर्णतेनंतर दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेसंबंधातील माहिती जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी विहित मुदतीत दिली नाही, त्याबद्दल शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.जस्मीतसिंग बग्गा यांनी केली.

श्री.बग्गा हे स्वत: कायद्याचे पदवीधर असून त्यांनी मागितलेली माहिती विकास नियंत्रण नियमावलीतील आहे. ही नियमावली संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यावेळच्या कामाच्या ताणामुळे हे उत्तर देण्यास विलंब झाला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे यांनी सांगितले.

नियमावलीसारखी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणारी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागणे वस्तुत: योग्य नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी विहित मुदतीत उत्तर देणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, बांधकाम नियंत्रण, उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामचंद्र तुकाराम शेळकंदे यांना देण्यात येत आहे. उत्तराला झालेला विलंब एकवेळ क्षमापित करण्याची त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नामदेव कुंडलिक भोसले
मु.पो. तांदुळवाडी, ता. माढा, जि. सातारा .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली .. उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सांगली
यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ९.४.२०१० |

३ **उपस्थित -**

**अपीलकर्ता** - श्री. नामदेव कुंडलिक भोसले
मु.पो. तांदुळवाडी, ता. माढा, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सांगली
यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. नितीन राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. जे. एन. कांबळे

४ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली यांचे चिटणीस यांच्याकडून साखर कारखान्याकडील थकबाकीच्या वसुलीबाबतची माहिती मागितली होती, ती विहित मुदतीत मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नामदेव कुंडलिक भोसले यांनी केली.

श्री. भोसले यांचा मूळ अर्ज व प्रथम अपिलाचा अर्ज पुरवठा शाखेतील लिपिकाने स्वीकारला होती. त्या शाखेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी वेगळे असल्यामुळे कार्यवाही झाली नव्हती. संबंधित अर्ज सर्वसाधारण शाखेकडेच वर्ग केला जाणे आवश्यक होते. संबंधित अर्ज प्राप्त करून घेतला असून दोन दिवसांत माहिती देण्यात येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली यांचे चिटणीस श्री. नितीन राऊत यांनी केले. माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपिले याबाबत योग्य दक्षता न घेतल्याबद्दल संबंधित लिपिकास लेखी समज दिली जाणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यास माहिती त्वरित द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, सांगली यांचे चिटणीस श्री. नितीन राऊत यांनी दि. १२.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 12 JUL 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती बीना अर्जुन गौड
घ.नं.१०, सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे-३६ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार (मागासवर्ग कक्ष ),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०६ / . पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १३.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ श्रीमती राणी तुकाराम ताटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार (मागासवर्ग कक्ष ),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी श्री. एन.एस.झुंजार | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अधीक्षक अभियंता कार्यालयात झालेल्या भरतीमध्ये आपली नियुक्ती न करणे बेकायदेशीर आहे. त्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (मागासवर्ग

कक्ष), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या पातळीवरून न मिळाल्याची तक्रार अपीलकर्त्या श्रीमती बीना अर्जुन गौड यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्रीमती गौड यांनी माहिती-मागणीच्या अर्जात प्रशासकीय कार्यवाहीविषयी अनेक आक्षेप नोंदविले असून त्याबाबत खुलासे, भाष्य अशी विचारणा केली आहे. अशाच स्वरुपाचे त्यांचे अपील क्र. ९६६/पुणे राज्य माहिती आयोगाने फेटाळले आहे. विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी नायब तहसीलदार (मागासवर्ग कक्ष), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एन. एस. झुंजार व अपिलीय प्राधिकारी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्रीमती राणी तुकाराम ताटे यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीनिवास नरसप्पा मैले
१७७०, दत्तनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
नाथ प्राईड, सिव्हिली चौक, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,
नाथ प्राईड, सिव्हिली चौक, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड,
सिव्हिली चौक, सोलापूर प्रतिनिधी श्री.यु.ई.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,
नाथ प्राईड, सिव्हिली चौक, सोलापूर श्री.यु.ई.शेख

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.श्रीनिवास नरसप्पा मैले यांनी श्री कुरूहिनशेट्टी ज्ञाती संस्था या संस्थेकडे शैक्षणिक विभागांची माहिती मागितली होती. ती न मिळाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड, सिव्हिली चौक, सोलापूर यांच्याकडे त्यांनी केलेले अपील अद्याप प्रलंबित आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाथ प्राईड, सिव्हिली चौक, सोलापूर श्री.यू.ई.शेख यांनी केले.

प्रथम अपिलाचा विहित मुदतीत निर्णय होण्याआधीच श्री.मैले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयाप्रमाणे विश्वस्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंदा वसंतराव चांदम
मु.पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री गुंडाळेश्वर हायस्कूल, गुंडाळ
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५/२०१० /कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १९.५.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. आनंदा वसंतराव चांदम
मु.पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. जी. चिखलीकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री गुडाळेश्वर हायस्कूल, गुंडाळ, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
श्री. पांडुरंग लहू पाटील

४ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

सन २००७ ते २००९ या काळातील निकालपत्रे, हजेरीपत्रके आदींबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुंडाळेश्वर हायस्कूल, गुंडाळ यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आनंदा वसंतराव चांदम यांनी केली.

श्री. चांदम यांच्या दि.६.८.२००९ च्या अर्जाला दि.२७.८.२००९ रोजी उत्तर देऊन रु.५०००/- शुल्क कळविले. युपीसीने पाठविलेले हे पत्र आपल्याला न मिळाल्याचे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्यापुढे सांगितले. श्री. चांदम यांनी सुधारित अर्ज देऊन माहितीची मागणी करावी व योग्य ते शुल्क भरुन माहिती घ्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिले. तथापि त्यानुसार त्यांनी सुधारित अर्ज दिला नाही व संपर्क साधला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुडाळेश्वर हायस्कूल, गुडाळ श्री. पांडुरंग लहू पाटील यांनी केले.

अपीलकर्त्यास केलेल्या पत्रव्यवहाराच्या आवक बारनिशीतील मूळ नोंदीची प्रत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुडाळेश्वर हायस्कूल, गुडाळ श्री. पांडुरंग लहू पाटील यांनी आयोगाला सादर करावी. तसेच अपीलकर्त्याने आवश्यक तर शुल्क भरुन १५ दिवसांत माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार श्री. चांदम यांनी शुल्क भरले नसल्यामुळे माहिती देण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुडाळेश्वर हायस्कूल, गुडाळ ता. राधानगरी श्री. पांडुरंग लहू पाटील यांनी यांनी मूळ अर्जाला दिलेल्या उत्तराच्या व जावक बारनिशीतील नोंदीच्या प्रतींसह दि.१८.६.२०१० च्या पत्रानुसार आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कर्ण धोंडिबा बाबरे
बी-महालक्ष्मीनगर, आय.टी.आय.मागे, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कर्ण धोंडिबा बाबरे
बी-महालक्ष्मीनगर, आय.टी.आय.मागे, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.एस.बी.सावस्कर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली.

सन १९८५ मध्ये सोलापूर महानगरपालिकेने पालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण योजना करून कर्मचाऱ्यांना घरे दिली. सुमारे १००० कर्मचाऱ्यांनी अर्ज केले होते. आवश्यक ती रक्कम भरूनही आपल्याला घर दिले नाही. त्यामुळे सर्व अर्जदारांच्या अर्जांच्या प्रतींसह संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती व माहिती आपण मागितली. ती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कर्ण धोंडिबा बाबरे यांनी केली.

एकूण तीन विभागांशी संबंधित अशी ही माहिती आहे. सन १९८४-८५ चे अर्ज व अन्य कागदपत्रे शोध घेऊनही उपलब्ध झाली नाहीत. तत्कालीन कर्मचाऱ्यांशीही संपर्क साधला, तसेच प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी अपीलकर्त्यासही अभिलेख अवलोकनासाठी येण्याची विनंती केली. ते आले नाहीत. घरे वाटपाची यादी, तसेच उपलब्ध होणारे मूळ अर्ज देता येणे शक्य आहे. अपीलकर्त्यास वेळोवेळी तसे कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.एस.बी.सावस्कर व अपिलीय प्राधिकारी तथा

सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यांनी आवश्यक तर अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या प्रतींची मागणी करावी व जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यानुसार निःशुल्क माहिती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

30 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल सत्यवान पाटोळे
मु.पो.मेंढापूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, मातोश्री शांताई औषधी व
सुगंधी वनस्पती उत्पादक सहकारी संस्था, गादेगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल सत्यवान पाटोळे
मु.पो.मेंढापूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली.

'मातोश्री शांताई औषधी व सुगंधी वनस्पती उत्पादक सहकारी संस्था,' गादेगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर या संस्थेकडे आपण मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरून संस्थेने नाकारली. माहिती निःशुल्क देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर, जि.सोलापूर यांनी दिल्यानंतरही संस्थेने माहिती दिली नाही. संस्थेला शासनाचे ३० लाख रूपये अनुदान मिळाले आहे, म्हणून संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विठ्ठल सत्यवान पाटोळे यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील तरतुदीनुसार संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते याचे कोणतेही पुरावे अपीलकर्त्याने दिलेले नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर, जि.सोलापूर यांच्या निर्णयातही त्याची पुष्टी होत नाही. अनुदानाबाबतचा पुरावा अपीलकर्त्यांनी सादर करावा, त्यानंतर याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार संदर्भित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते याचे कोणतेही पुरावे अद्यापपर्यंत अपीलकर्त्यांनी सादर केलेले नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विलास भिमाजी काळे
सुभाष चौक, ता. शिरूर, जि. पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषि),
पंचायत समिती, आंबेगाव, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
घोडेगाव ग्रामपंचायत, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.६.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषि),<br>पंचायत समिती, आंबेगाव, जि. पुणे श्री. जी. एस. केदारी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>घोडेगाव ग्रामपंचायत, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे<br>श्री. सचिन तुकाराम उंडे | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

बिअर शॉपीसाठी वारंवार मागणी करूनही 'ना हरकत दाखला' ग्रामपंचायतीने दिला नाही व त्याबाबतची माहितीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विलास भिमाजी काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या विनंतीनुसार त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आली असून तशी पोहच आहे. नवीन दारू व्यवसाय व बिअर शॉपी यांना 'ना हरकत दाखला' / परवाना न देण्याचा ठराव ग्रामपंचायतीने केलेला असल्यामुळे श्री. काळे यांना दाखला देण्यात आला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, घोडेगाव ग्रामपंचायत, घोडेगाव श्री. सचिन तुकाराम उंडे व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, घोडेगाव जि. पुणे श्री. जी. एस. केदारी यांनी केले. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 24 JUL 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुरिंदरलाल सी. सेठी
८८, साहनी सजन पार्क, पुणे-४० .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,
जिल्हा परिषद, पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सरदार दस्तूर बॉईज हायस्कूल, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.६.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. सुरिंदरलाल सी. सेठी, ८८, साहनी सजन पार्क, पुणे-४०<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,<br>जिल्हा परिषद, पुणे श्री. विद्या शिंदे<br>**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,<br>सरदार दस्तूर बॉईज हायस्कूल, पुणे-१ मिसेस. लिली बी. पटेल | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या पत्नीला सरदार दस्तूर बॉईज हायस्कूलमधून निलंबित करण्यात आले असून त्या अनुषंगाने आपण मागिलेली माहिती जाणीवपूर्वक दिली जात नाही. या संदर्भात दोन वर्षांच्या कालावधीत आपण ५७ अपिले केली असून एकाही अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेला नाही. ठराविक विद्यार्थ्यांचे गुण शाळेने बदलले असल्यामुळे माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुरिंदरपाल सी. सेठी यांनी केले.

श्री. सेठी यांच्या पत्नीचे निलंबन अद्याप चालू आहे. चौकशी चालू असल्याच्या काळात मागितलेल्या माहितीची प्रत त्यांना देण्यात आली असून त्याची पोहच संस्थेकडे आहे. अनेक अर्जाद्वारे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली असून, चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही, तसेच संबंधित प्रत्येक विद्यार्थ्याच्या उत्तर पत्रिकांची प्रतीची मागणी श्री. सेठी यांनी केली असून ती पूर्ण करता येणे शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सरदार दस्तूर बॉईज हायस्कूल, पुणे श्रीमती लिली बी. पटेल यांनी केले.

चौकशी पूर्ण झाल्याशिवाय माहिती देता येणार नाही, हे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सरदार दस्तूर बॉईज हायस्कूल, पुणे यांचे प्रतिपादन योग्य आहे. अपीलकर्त्याने त्याच त्याच माहितीसाठी आतापर्यंत ५७ अपिले केली असून एकाच व्यक्तीच्या एकाच विषयासाठी एवढी मोठ्या प्रमाणावरील अर्जांची व अपिलांची दखल घेणे कार्यालयीन कामकाज व व्यवस्था लक्षात घेता शक्य होत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे यांनी केले. ते रास्त आहे.

चौकशीच्या दरम्यान अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असली तरी मुद्दा क्र. अे व मुद्दा क्र.डी ची तसेच वर्ग ८-क, ९-अ, ९-ब, १०-अ व १०-ब या वर्गांच्या २००७-२००८ व २००८-०९ या वर्षांच्या अंतिम निकालाची केवळ यादी अपीलकर्त्यास योग्य ते शुल्क आकारून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सुनावणीच्या दिवशीच अपीलकर्त्यास माहितीसाठीचे शुल्क कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सरदार दस्तूर बॉईज हायस्कूल, पुणे यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय बबन काटे
प्लॉट नं.११, सेक्टर १९, शरदनगर चिखली रोड,
के.जे.चावला शाळेमागे, चिंचवड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नियोजन विभाग / अतिक्रमण विभाग /
विभाग क्र.१, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२९+१५३१+१५३२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे

**जन माहिती अधिकारी** तथा नियोजन विभाग / अतिक्रमण विभाग /
विभाग क्र.१, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे
श्री.एस.बी.मानकरे / श्री.एन.एस.वेदपाठक / श्री.उमाप सुगंध

७| माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपल्या मिळकतीच्या संदर्भात आपण केलेल्या अतिक्रमणविषयक तक्रारीबाबतची माहिती पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अतिक्रमण विभागाकडून मिळाली नाही. नियोजन विभागाकडून हवी असलेली नकाशाची प्रत विहित मुदतीत मिळाली. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. संजय बबन काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.काटे यांनी तीन अर्ज केले होते. अतिक्रमण विभागाकडे केलेल्या अर्जावर सही नसल्यामुळे अर्ज नाकारण्यात आले. अर्ज फेरसादर करण्यास अतिक्रमण विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले होते. परंतु त्यांनी अर्ज फेरसादर केला नाही. तरीही योग्य ते शुल्क आकारून सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे यांनी दिले. अन्य विभागांनी माहिती दिली असल्यामुळे अपील निकाली काढले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नियोजन विभाग, अतिक्रमण विभाग, विभाग क्र.१, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे अनुक्रमे श्री.एस.बी.मानकरे, श्री.एम.एस.वेदपाठक, श्री.उमाप सुगंध व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्या आदेशानुसार माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा अतिक्रमण विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.डी.एम.जोशी यांनी दि.२३.६.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. मूळ अर्जावर श्री.काटे यांनी स्वाक्षरी केलेली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास

प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्या निर्णयानंतर शुल्काबाबत त्यांना समक्ष सांगितले असता दुसऱ्या दिवशी शुल्क भरणार असल्याचे सांगून ते आले नाहीत. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे श्री.डी.एम.जोशी यांनी या खुलाशात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्र.१५२९+१५३२ निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र.१५३१ मध्ये जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, अतिक्रमण विभाग, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, पिंपरी, पुणे यांनी अपीलकर्त्यास माहिती त्वरित व नि:शुल्क देऊन अनुपालन अहवाल दि.१०.८.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी विनायक मोटे
दापोडी, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी विनायक मोटे
दापोडी, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे तत्कालीन श्री.प्रशांत आवटे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे
विद्यमान-प्रतिनिधी श्री.एन.एस.हणमघर, तत्कालीन-श्री.निलप्रसाद चव्हाण

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपण केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाही निवासी नायब तहसीलदार यांनी केली नाही. त्यामुळे आपले नुकसान हेत आहे. संबंधित कार्यवाही त्वरित केली जावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी विनायक मोटे यांनी केली.

श्री.मोटे यांच्या मूळ अर्जानुसार माहिती विहित मुदतीत दिली. संबंधित अर्ज मंडल अधिकारी व तलाठी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आला असल्याचे त्यांना कळविले. अपीलकर्ता मूळ अर्जाला व पत्रव्यवहाराला दिलेल्या उत्तरावर नवे मुद्दे उपस्थित करून त्यावर उत्तर/खुलासा मागतात, अशा स्वरूपाची माहिती देणे शक्य होत नाही, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड, ता.दौंड, जि.पुणे श्री.निलप्रसाद चव्हाण यांनी केले. सध्या चारही नायब तहसीलदारांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांनी केलेली कार्यवाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. तथापि संबंधित प्रकरणी मंडल अधिकारी व कामगार तलाठी दापोडी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसांत द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
29 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर बाबूराव वाबळे
देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, बारामती,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३३ /२००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, बारामती,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.साळवे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देऊळगाव रसाळ,
ता.बारामती, जि.पुणे श्री.एम.पी.उबाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण दि.१६.७.२००९ च्या (दि.२०.७.२००९ रोजी कार्यालयास प्राप्त झालेल्या) अर्जानुसार माहितीसाठी शुल्क भरण्याबाबत दि.१७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे यांनी कळविले. त्यानुसार दि.२३.९.२००९ रोजी शुल्क भरूनही ग्रामसेवकांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर बापूराव वाबळे यांनी शुल्क भरल्याच्या चलनाच्या प्रतीसह राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

शुल्क भरल्याची पावती श्री.वाबळे यानी कार्यालयाला सादर केली नाही. पूर्वीही अशाच स्वरूपाचा अर्ज व अपील त्यांनी केले होते. शुल्क भरल्याची पावती सादर करून माहिती न्यावी, असे कळवूनही त्यांनी पूर्तता केली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे श्री.एम.पी.उबाळे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.एस.साळवे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यांनी शुल्क भरल्याची पावती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देऊळगाव रसाळ, ता.बारामती, जि.पुणे यांच्याकडे सादर करून आवश्यक तर माहिती प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

24 JUL 2010